पुढारी

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नियमावली, आराखड्यास विद्या परिषद बैठकीत मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून लागू करण्यात येणाऱ्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नियमावली व आराखड्यास विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी विद्या परिषदेची बैठक झाली. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेल्या नियमावली, आराखड्याचा अहवाल स्वीकारण्यात आला. चालू वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, अधिष्ठाता आर.के.कामत, प्रभारी अधिष्ठाता आर.जी.कुलकर्णी, डॉ. मेघा गुळवणी यांच्यासह विद्यापरिषद सदस्य उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
30 JUL 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनातून गुणात्मक दर्जा शक्य

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधकीय नीतिमत्तेखेरीज शैक्षणिक कार्यात कोणत्याही प्रकारचा गुणात्मक दर्जा प्राप्त करता येणे अशक्य आहे. त्यामुळे या नीतिमत्तेला संशोधकांनी सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त 'संशोधन व प्रकाशन नीतिमानता' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या वेबिनारसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफर मुरारी तपस्वी व केंद्रीय ग्रंथालय, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मद्रास (चेन्नई) ग्रंथपालचे महेंद्र जाधव हे मार्गदर्शक होते. प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांनी संशोधन पद्धती, आराखडा, शास्त्र, सामाजिक शास्त्रातील संशोधन इत्यादींच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. सचिनकुमार पाटील व पी. बी. बिलावर यांनी मार्गदर्शकांचा परिचय करून दिला. मुरारी पी. तपस्वी यांनी 'रिसर्च इंटिग्रिटी : बर्डस् आय व्ह्यू' या विषयावर मार्गदर्शन केले. महेंद्र एन. जाधव यांनी 'क्रायटेरिया फॉर सिलेक्टिंग जर्नल फॉर पब्लिकेशन' या विषयावर मार्गदर्शन केले. एस. व्ही. थोरात यांनी प्रश्नोत्तरांचे सत्र घेतले. आर. डी. खामकर यांनी आभार मानले. वेबिनारसाठी देशभरातील ५०० हून अधिक अभ्यासकांनी सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन संशोधक विद्यार्थी संग्राम किल्लेदार यांनी केले.

पुण्यनगरी



कोल्हापूर : विद्यार्थ्यांकडून पत्रकारितेशी संबंधित विविध ग्रंथ अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

# ऑनलाईन पत्रकारिता विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. विद्यार्थ्यांनी पत्रकारितेशी संबंधित विविध ग्रंथ अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे सुपूर्द केले.

प्रारंभी पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रस्ताविक मतीन शेख यांनी केले. डॉ. शिवाजी जाधव, सुमित कदम, अक्षय दळवी, सुशांत उपाध्ये आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निकिता बागणे, संजय भोसले, धनंजय देशपांडे, गीतेश डकरे, अनुप गवंडी, रोहित जाधव, नेहा जोशी, राजेश कदम, अमृता कोपार्डे, अजय पोवार, ज्योती पाटील, विजय पाटील, सुनंदा सुतार आणि नम्रता वडेर या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. राजेश कदम यांनी आभार मानले.

30 JUL 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘प्रोजेक्ट टायगर’मुळे सर्वाधिक वाघ भारतात

## मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामानुजन : जागतिक व्याघ्रदिन कोल्हापुरात उत्साहात : व्यापक जनजागृती मोहिमेची गरज

प्रतिनिधी
कोल्हापूर

वाघ हा अम्ब्रेला स्पेसिस म्हणजेच जंगल या परिसंस्थेतील महत्वाचा घटक आहे. वाघांमुळेच अरण्य आणि अरण्यामुळे व्याघ्रादी पशु सुरक्षित राहतात. सद्यःस्थितीत प्रोजेक्ट टायगर प्रकल्पातर्गत केलेल्या कामामुळे जगातील सर्वाधिक वाघ भारतात आहेत, अशी माहिती मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामानुजन यांनी दिली. नामशेष होण्याच्या जवळपास पोहोचलेला वाघ जतन करण्यासाठी शासन, वनविभाग आणि पर्यावरणवादी संघटनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. त्यामध्ये सर्वसामान्यांनीही सहभाग घेतला पाहिजे. वाघांच्या जतन, संवर्धनाबरोबरच चोरट्या शिकारीपासून संरक्षणासाठी व्यापक जनजागृती मोहिमेची गरज असल्याचेही रामानुजन यांनी सांगितले.

सह्याद्री व्याघ्र राखीव प्रकल्प व शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक व्याघ्रदिन शुक्रवारी साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे मुख्यवनसंरक्षक रामानुजन यांनी व्याघ्रदिनाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांसमोर विशद केली.




कोल्हापूर : सह्याद्री व्याघ्र राखीव प्रकल्प आणि शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या वतीने शुक्रवारी जागतिक व्याघ्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्य वनसंरक्षक रामानुजन, मानद वन्यजीव रक्षक रमण कुलकर्णी यांच्यासह विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

रामानुजन म्हणाले, अनिर्बंध शिकार, तस्करी आणि वाघाच्या नैसर्गिक अधिवासावरील झालेले अतिक्रमण यामुळे जगातील नऊ पैकी तीन प्रजाती लुप्त झाल्या आहेत. शिल्लक प्रजातीतील वाघांची संख्या झपाट्याने रोडावत चालल्यामुळे रशियातील सेंट पीटर्सबर्गमध्ये २०१० साली वाघांविषयी शिखर परिषदेत जागतिक व्याघ्रदिनाची घोषणा करण्यात आली. या दिनाच्या माध्यमातून वाघांच्या संरक्षणाबरोबर जतन आणि संवर्धनविषयी जनजागृती आणि कृती सुरू आहे. त्यामध्ये जनतेचाही सहभाग महत्वाचा आहे.

या कार्यक्रमासाठी मानद वन्यजीव रक्षक रमण कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक अमोल कुलकर्णी यांनी नियोजन केले. पर्यावरण शास्त्र विभागाचे समन्वयक श्रीकांत भोसले यांनी स्वागत केले केले. डॉ. पी. सी. भास्कर, उदय पाटील, प्रवीण सावंत, भक्ती कुलकर्णी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक डॉ. आर. के. कामत यांचे सहकार्य लाभले. दरम्यान, व्याघ्रदिनाचे औचित्य साधनू कोल्हापूर जिल्ह्यातील विविध प्राथमिक माध्यमिक शाळांमध्ये वाघांविषयी जनजागृती निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

तरुण भारत

# संशोधकीय नितीमत्तेतून शैक्षणिक दर्जा वाढवा

- संशोधन व प्रकाशन निती-मानता वेबिनारमध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांचे आवाहन
- देशभरातून पाचशेवर अभ्यासकांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक कार्यात कोणत्याही प्रकारचा गुणात्मक दर्जा प्राप्त करायचा असेल तर सर्वात आधी संशोधकीय नितीमत्तेचा अवलंब करावा लागेल. तेव्हा संशोधकांनी या नितीमत्तेला सर्वोच्च प्राधान्य देऊन शैक्षणिक कार्याची उंची वाढवण्यावर भर द्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'संशोधन व प्रकाशन नितीमानता' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारमध्ये ते बोलत होते. या वेबिनारसाठी डॉ. मुरारी पी. तपस्वी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, गोवा व डॉ. महेंद्र. एन. जाधव, ग्रंथपाल, केंद्रीय ग्रंथालय, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, मद्रास (चेन्नई) हे मार्गदर्शक होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वेबिनारचे उद्‌घाटन केले. तत्पूर्वी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी संशोधन पद्धतीचा आराखडा व शास्त्र/सामाजिक शास्त्रातील संशोधन इत्यादींच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

यानंतर डॉ. पी. बी. बिलावर यांनी अनुक्रमे डॉ. मुरारी पी. तपस्वी व डॉ. महेंद्र जाधव या मार्गदर्शकांचा परिचय करून दिला. गोव्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफीचे डॉ. मुरारी पी. तपस्वी यांनी 'रिसर्च इंटिग्रिटी : बर्ड्स आय व्ह्यू' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच चेन्नई येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी केंद्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल 'क्राइटेरिया फॉर सिलेक्टिंग जर्नल फॉर पब्लिकेशन' या विषयावर डॉ. महेंद्र. जाधव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. एस. व्ही. थोरात यांनी प्रश्नोत्तरांचे सत्र घेतले. वेबिनारसाठी देशभरातील ५०० हून अधिक अभ्यासकांनी सहभाग घेतला होता. या वेबिनारचे संशोधक विद्यार्थी संग्राम किल्लेदार यांनी सूत्रसंचालन केले. ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रभारी अधिविभागप्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. आर. डी. खामकर यांनी आभार मानले.

